सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# नागरिकांची सनद

--*-- कार्यालय --*--

प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
भामरागड जि. गडचिरोली

# नागरिकांची सनद

# आदिवासी विकास विभाग - महाराष्ट्र शासन

## प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भामरागड

**प्रस्तावना-**

प्रशासन लोकाभिमुख होण्यासाठी तसेच शासनाच्या दैनंदिन कामकाजात पारदर्शकता आणुन महाराष्ट्र शासनाने आदिवासी विकास विभागाचे धोरण प्रभावीपणे राबविण्यासाठी नागरिकांची सनद (सिटीझन चार्टर) तयार करण्यात आली आहे. जनतेला त्यांच्या कामाबाबत होणारी गैरसोय टाळण्यासाठी या नागरिकाच्या सनदेची निर्मिती करण्यात आली असून जनतेचे काम विहित मुदतीच्या आत करुन घेण्याचा हक्क खऱ्या अर्थाने या सनदेद्वारे प्राप्त होणार आहे. या सनदेद्वारे जनतेला चांगली सेवा देणे तसेच कायद्याची आणि नियमांची अंमलबजावणी संबंधित अधिकाऱ्याद्वारे करुन, पारदर्शक प्रशासनाची खात्री जनतेला देता येईल. अशा महत्वाच्या बाबींचा समावेश यात आहे.

शासनाकडून जनतेला विविध प्रकारच्या सेवा उपलब्ध करुन दिल्या जातात. परंतू त्या सेवांची पुरेपुर माहिती सर्वसामान्य जनतेला नसते. तसेच या सेवा कमीत कमी वेळेत मिळाव्यात, त्या दर्जेदार असाव्यात अशी जनतेची अपेक्षा असते. याबरोबरच शासकीय कामकाजात सुधारणा करणे, पारदर्शकता आणणे व भ्रष्टाचाराला आळा घालुन जनतेप्रती आपले उत्तरदायित्व जोपासणे, या उद्दिष्टांच्या पुर्ततेकरिता नागरिकांची सनद (सिटीझन चार्टर) तयार करण्यात आली आहे. विभागातील विविध स्तरावरील कार्यालयाकडून जनतेला उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या विविध सेवांचा यात समावेश आहे.

**उद्दिष्टये-**

सामान्य जनतेला कार्यक्षम आणि आदिवासी विकास विभागाच्या योजनांची संपूर्ण माहिती देण्यास महाराष्ट्र शासन या सनदेद्वारे कटिबध्द आहे. आदिवासी विकास विभागाशी संबंधित कामे ज्या शासकीय/ अनुदानित आश्रमशाळा, शासकीय वसतिगृह / प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प / अपर आयुक्त, आदिवासी विकास यांच्याकडून करण्यात येतात. तसेच आदिवासी विकास विभागाकडून ज्या विविध योजना राबविल्या जातात. तसेच नागरिकांना ज्या सेवा दिल्या जातात, त्याबाबतची माहिती व संबधित सेवाबाबत कालमर्यादा याबाबतचे विवरण सुधारीत स्वरुपात **परिशिष्ट 2 मध्ये** दिलेले आहे.

**दृष्टिक्षेप (Vision)-**

भारतीय संविधानाच्या मार्गदर्शक तत्वानुसार राज्यातील दुर्बल घटक विशेषत: अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या लोकांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंबंध जपण्यासाठी विशेष काळजी घ्यावी आणि त्यांचे सामाजिक अन्याय व इतर पिळवणुकीपासून संरक्षण करणे, त्याअनुषंगाने अनुसूचित जमातीचा शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक सुधारणांच्या कार्यक्रमावर भर देण्यात आला आहे. त्यानुसार आदिवासी विकास विभाग विविध विकास योजना राबवित आहे.

**उद्देश (Mission)-**

प्रतिसाद देणारी, पारदर्शक आणि विद्वत्त संस्था, असा नावलौकिक प्रस्थापित करण्यासाठी आदिवासी विकास विभागाकडून अनुसूचित जमातीला अधिक संपन्न, विस्तृत आणि शाश्वतरित्या विकसित करण्याच्या हेतुने सर्व स्तरावर सकारात्मक हस्तक्षेपास उत्प्रेरणा देऊन विभागास अधिक क्रियाशील करणे.

**2) आदिवासी विकास विभागाची रचना**

शासन स्तरावर मा. मंत्री (आदिवासी विकास विभाग), मा. राज्यमंत्री (आदिवासी विकास विभाग) यांच्या अधिपत्याखाली मा. प्रधान सचिव (आदिवासी विकास विभाग) तसेच मा. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक व अपर आयुक्त,

आदिवासी विकास, नागपूर हे वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी आहेत. शासन स्तरावर अनुसूचित जमातीकरिता विविध धोरणात्मक निर्णय, अर्थसंकल्प इत्यादी बाबी हाताळल्या जातात.

**प्रशासकिय घटक :** भामरागड प्रकल्पाचे अधिनस्त सहाय्यक प्रकल्प अधिकारी (विकास), सहाय्यक प्रकल्प अधिकारी (प्रशासन), लेखा अधिकारी (वित्त), संशोधन अधिकारी (नियोजन), सहाय्यक प्रकल्प अधिकारी (शासकीय आश्रमशाळा), सहाय्यक प्रकल्प अधिकारी (अनुदानित आश्रमशाळा), सहाय्यक प्रकल्प अधिकारी (शासकिय वसतिगृह), सहाय्यक प्रकल्प अधिकारी (शिष्यवृत्ती), असून त्यांच्या स्तरावर विभागाच्या सर्व विषयांची विभागणी करण्यात आलेली आहे. **(परिशिष्ट- 1 सोबत जोडले आहे.)** नागपूर विभागातील आदिवासी उपयोजना क्षेत्रात 9 प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अशी विभागणी करण्यात आलेली आहे.

### 3) कार्यपूर्तीचे वेळापत्रक

आदिवासी विकास विभागामार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवांच्या कार्यपर्तीचे वेळापत्रक (परिशिष्ट-2) मध्ये नमुद करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांचे बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडण्यास होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम 2005 मधील प्रकरण क्र. 3 च्या कलम 11 मध्ये नमुद केलेल्या न्यायप्रविष्ठ बाबी, लोक आयुक्त, उपलोक आयुक्त आणि अन्य राज्य घटनात्मक संस्था, आयोग, न्यायिकवत बाबी, केंद्र किंवा अन्य राज्य शासनाच्या संबंधातील प्रकरणे, विधी विभागांशी संबंधित बाबी, मंत्रिमंडळास सादर होणाऱ्या मुख्य धोरणात्मक बाबी इ. ना परिशिष्ट-2 मधील मुद्दा क्र. 10 येथील वेळापत्रकातुन सूट राहील. नैसर्गिक आपत्ती व कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न इत्यादी उद्‌भवल्यास या वेळापत्रकातील कार्यपूर्तीच्या कालावधीत वाढ होऊ शकेल.

### 4) नियम / अधिनियम / शासन निर्णय

या विभागाशी संबंधित नियम/अधिनियम/महत्वाचे शासन निर्णय www.mahatribal.gov.in या आदिवासी विकास विभागाच्या संकेत स्थळावर (वेबसाईट) उपलब्ध असुन ते नियमित अद्यावत करण्यात येतात.

### (5) (अ) गाऱ्हाणी/तक्रारी यांचे निराकरण -

कार्यपूर्तीस होणारा विलंब वा अन्य काही गाऱ्हाणी असल्यास त्यासंबंधी अपिलीय अधिकाऱ्याकडे तक्रार नोंदविता येईल. सबंधित अपिलीय अधिकाऱ्यांचे दुरध्वनी क्रमांक **परिशिष्ट**-3 मध्ये देण्यात आले आहेत.

### (ब) नागरिकाच्या सनदेचा आढावा / सिंहावलोकन

या नागरिकाच्या सनदेचा उपयुक्ततेबाबत तथा परिणामकारकतेचा आढावा आदिवासी विकास विभागाकडून दरवर्षी घेण्यात येईल व त्यात आवश्यकतेनुसार बदल करण्यात येतील.

### (क) जनसामान्यांकडून सूचना

ही नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरिकांच्या बहुमुल्य आणि यथोचित सूचनांचा गांभीर्यपूर्वक विचार करुन त्यात वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येतील. आदिवासी विकासस विभागाच्या अधिनस्त येणाऱ्या सेवा उपभोगणाऱ्या नागरिकांना आपले हक्क मांडण्यासाठी सनद नेहमीच सहकार्य करेल.

### (6) नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी

आदिवासी विकास विभाग नागरिकांच्या या सनदेची अंमलबजावणी करण्यास कटिबध्द आहे. आदिवासी विकास विभाग आपल्या अधिपत्याखालील सेवा कर्तव्यभावनेने व कार्यतत्परतेने उपलब्ध करुन देण्याची हमी देत आहे. या सेवा पुरविताना नागरिकांना सौजन्यपूर्ण वागणूक देण्याची जबाबदारी प्रत्येक अधिकारी/ कर्मचाऱ्यांची राहील. आदिवासी विकास विभागाच्या संकेतस्थळावर तसेच प्रत्येक कार्यालयामध्ये नागरिकांच्या सनदेचे फलक लावून सनदेस व्यापक प्रसिध्दी देण्यात येईल.

प्रकल्प अधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
भामरागड जि. गडचिरोली

## आदिवासी विकास विभाग व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भामरागड प्रशासकिय यंत्रणा व रचना पुढिलप्रमाणे

मा. मंत्री, आदिवासी विकास विभाग

↓

मा. राज्यमंत्री, आदिवासी विकास विभाग

↓

मा. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग

↓

मा. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक

↓

मा. अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर

↓

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भामरागड

- सहाय्यक प्रकल्प अधिकारी (प्रशासन)
  - कार्यालय अधिक्षक
  - लघुटंकलेखक
  - वरिष्ठ लिपीक
  - लिपीक-टंकलेखक
  - शिपाई
  - चौकीदार
  - सफाईगार
- सहाय्यक प्रकल्प अधिकारी (विकास)
  - वरिष्ठ आ.वि.नि.
  - आदिवासी वि.नि.
  - वरिष्ठ लिपीक
  - कनिष्ठ लिपीक
- सहाय्यक प्रकल्प अधिकारी (शिक्षण) (शा.आ.शाळा)
  - क.शि.वि.अ.
  - कनिष्ठ लिपीक
- सहाय्यक प्रकल्प अधिकारी (शिक्षण) (वसतीगृह)
  - वरिष्ठ आ.वि.नि.
  - क.शि.वि.अ.
  - कनिष्ठ लिपीक
- सहाय्यक प्रकल्प अधिकारी (शिक्षण) (अनुदानित)
  - क.शि.वि.अ.
  - कनिष्ठ लिपीक
- नियोजन अधिकारी
  - संशोधन सहाय्यक
  - सांख्यिकी
  - सहाय्यक
  - लिपीक-टंकलेखक
- लेखाधिकारी
  - सहा.लेखाधिकारी
  - उपलेखापाल
  - भांडारपाल
  - रोखपाल
  - वरिष्ठ लिपीक
  - लिपीक-टंकलेखक

### शासकिय आश्रमशाळा (08)

- मुख्याध्यापक
- कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक
- माध्यमिक शिक्षक
- पदविधर प्राथमिक शिक्षक
- प्राथमिक शिक्षक
- अधिक्षक (पुरुष)
- अधिक्षिका (महिला)
- प्रयोगशाळा सहाय्यक
- कनिष्ठ लिपीक
- ग्रंथपाल
- प्रयोगशाळा परिचर
- शिपाई
- स्वयंपाकी
- कामाठी
- सफाईगार
- चौकीदार

### शासकीय वसतिगृह (04)

- गृहपाल (महिला) (पुरुष)
- कनिष्ठ लिपीक
- शिपाई
- सफाईगार
- चौकीदार

### अनुदानित आश्रमशाळा (16)

- मुख्याध्यापक
- कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक
- माध्यमिक शिक्षक
- पदविधर प्राथमिक शिक्षक
- प्राथमिक शिक्षक
- अधिक्षक (पुरुष)
- अधिक्षिका (महिला)
- प्रयोगशाळा सहाय्यक
- कनिष्ठ लिपीक
- ग्रंथपाल
- प्रयोगशाळा परिचर
- शिपाई
- स्वयंपाकी
- कामाठी
- सफाईगार
- चौकीदार

# प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भामरागड

**प्रकल्प अधिकारी**

**(वेतनस्तर :- संवर्ग पद )**

- प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भामरागड यांना प्रदान केलेल्या वित्तीय, प्रशासनिक अधिकारांच्या अनुषंगाने आवश्यक ती कर्तव्य करणे.
- आदिवासी उपयोजनेच्या नियोजन विषयक विशिष्ट विकास क्षेत्रानिहाय नेमून दिलेली विवक्षित जबाबदारी पार पाडणे.
- क्षेत्रीय यंत्रणेतील सर्व वर्ग 3 व वर्ग 4 संवर्गाचे विभागाचे नियंत्रण ठेवणे, यासाठी सर्व संबंधीत मुख्याध्यापक यांचेशी योग्य तो समन्वय साधणे.
- विनीयोजन लेखे, लेखा परिक्षण आक्षेप यांसारख्या महत्वाच्या बाबीचे कामकाज पाहणे. विधीमंडळविषयक बाबींचा समन्वय आणि पूर्तता करणे.
- आदिवासी उपयोजने अंतर्गत विविध योजनांच्या अंमलबजावणीच्या संदर्भात शासनाच्या विविध विभाग प्रमुखांशी संपर्क आणि समन्वय ठेवणे.

**सहाय्यक प्रकल्प अधिकारी (रचना व कार्यपध्दती / प्रशासन)**

**(वेतन स्तर :- एस-15: 41800-132300)**

- गट ब ते ड या संवर्गातील सर्व अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवाविषयक बाबी हाताळणे.
- वर्ग-2 ते 4 यासंवर्गातील अधिकाऱ्यांच्या वैयक्तिक नस्त्या व त्यांच्या सेवाकाळाच्या नोंदी घेणे व अद्यावत ठेवणे.
- मानीव तारीख, दक्षतारोध, सेवाज्येष्ठता इत्यादी विषयक कामकाज.
- सर्व संवर्गातील मंजूर, भरलेल्या व रिक्त पदांची माहिती वेळोवेळी आढावा घेऊन संकलित करणे.
- वर्ग 4 संवर्गाच्या आरक्षणविषयक आढावा घेणे.
- प्रकल्पस्तरीय वर्ग 4 कर्मचाऱ्यांना वरिष्ठ वेतनश्रेणी / निवडश्रेणी देणेसंबंधात समित्यांचे आयोजन करणे.
- वर्ग 3 ते 4 कर्मचाऱ्यांचया तक्रारीच्या अनुषंगाने कार्यवाही करणे.
- वर्ग 3 ते 4 च्या कर्मचाऱ्यांच्या अग्रीमाबाबत कार्यवाही करणे.
- वर्ग 3 ते 4 कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीविषयक कार्यवाही करणे.
- वर्ग 2 ते 4 या संवर्गातील अधिकारी / कर्मचारी यांची प्रशासनविषयक न्यायालयीन, लोकआयुक्त, अपील प्रकरणे व विभागीय चौकशी करणे.
- वर्ग 3 संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या स्थानांतरण विषयक बाबी हाताळणे.
- प्रशासनविषयक लोकसभा, राज्यसभा, विधानसभा, विधानपरिषद प्रश्न, कपात सुचना, लक्षवेधी सुचना, आश्वासन इत्यादी माहिती मागविणे व पाठविणे.
- भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांच्या प्रशासनविषयक सर्व बाबी सांभाळणे.
- गट क व ड संवर्गातील विभागांतर्गत स्थानांतरण विषयक बाबी हाताळणे.
- विभागाच्या कार्यक्षेत्रातील सर्व अधिकारी / कर्मचारी यांचे प्रशिक्षण आयोजित करणे.
- प्रशासनाशी संबंधित असणारी सर्व नियतकालिके, अहवाल प्राप्त करणे, त्यांचे संकलन करुन शासनास वेळोवेळी सादर करणे.
- आदिवासी युवकांसाठी सेवायोजन विषयक कामाकज हाताळणे.
- प्रकल्प कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी तसेच शासकीय आश्रमशाळा / वसतिगृहातील वर्ग 3 ते वर्ग 4 कर्मचाऱ्यांच्या आस्थापनाविषयक सर्व बाबी, रजा, भविष्य निर्वाह निधी, प्रवास अग्रीमे, रजा प्रवास सवलत, वेतनवाढी, वेतननिश्चिती, कालबध्द पदोन्नती, सेवानिवृत्ती प्रकरणे, सण अग्रीम इत्यादी कामकाज.
- किरकोळ रजा हिशोब, वैकल्पीक सुट्टया, कर्मचारी हजेरीपट, उशीरा येणाऱ्या कर्मचारी यांचे हजेरीपट व त्यावर देखरेख, नियंत्रण ठेवणे.
- टपाल आवक, जावक बाबतचे सर्व कामकाज.
- प्रकल्प कार्यालयातील वाहने नियंत्रण-इंधन दुरुस्ती, निगा, निर्लेखन करणे, तसेच कार्यालयातील संगणक, फक्स, इंटरकॉम, दुरध्वनी, चक्रमुद्रण, टंकलेखन यंत्रे इत्यादीबाबत मंजूरी, निगा, देखभाल, निर्लेखन विषयक कामकाज.
- शिष्टाचार विषयक सर्व कामकाज.

- प्रकल्प कार्यालयातील सर्व सभांचे आयोजन, सभांचे इतिवृत्त, अल्पोपहार, चहापान व्यवस्था करणे, विश्रामगृह आरक्षण करणे इत्यादी कामकाज.
- प्रकल्प कार्यालयातील भांडार, जडसंग्रह साहित्य व्यवस्थीत ठेवणे व त्यासंबंधाने नोंदवही ठेवणे.
- सर्व कार्यासनातील प्रलंबित संदर्भ, प्रकरणे यांचा पाक्षीक, मासिक आढावा यासंबंधीची माहिती संकलीत करुन मा. प्रकल्प अधिकारी यांना सादर करणे.
- प्रकल्प कार्यालयातील स्टेशनरी खरेदी, चतुर्थश्रेणी कर्मचारी यांना गणवेश, सायकली, छत्री पुरवठा करणे.
- सभागृह व्यवस्थापन करणे, कार्यालयीन स्वच्छता ठेवणे व स्वच्छतागृहे यांची निगा राखणे.
- प्रकल्प कार्यालयाची रचना व कार्यपध्दतीनुसार निरिक्षणे.
- कार्यालयाशी संबंधीत केंद्रीय माहिती अधिकाराबाबत केलेल्या कार्यवाहीचा मासिक अहवाल वरिष्ठ कार्यालयास सादर करणे.
- शासकीय आश्रमशाळा/ वसतिगृहांना आवश्यक मालांचा पुरवठा करण्याकरीता मागणी मागविणे, निविदा मागविणे, दर करार मागविणे, पुरवठा करणे इत्यादीविषयक कामे.
- शासकीय आश्रमशाळा / वसतिगृहांसाठी सुविधांचा पुरवठा करणेसाठी मागणी नोंदविणे व पुरवठा करणे.
- शासकीय आश्रमशाळा / वसतिगृहांसाठी सुविधांचा पुरवठा करणेसाठी दरपत्रक निविदा मागविणे व पुरवठा करणेबाबतचे नियोजन करणे.

**सहाय्यक प्रकल्प अधिकारी (विकास)**
**(वेतन स्तर :- एस-15: 41800-132300)**

- भामरागड प्रकल्पाचा अनुसूचित क्षेत्राचा वार्षिक प्रशासकिय अहवाल तयार करणे.
- न्युक्लिअस बजेट योजनेअंतर्गत अपर आयुक्तालय स्तरावरील आर्थिक मर्यादेबाबतचे प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत कार्यवाही करणे व अन्य त्याअंतर्गतच्या योजनाबाबतचे कामकाज करणे.
- अनुसूचित जमाती कल्याण समिती / जनजाती सल्लागार परिषद / अनुसूचित जाती जमाती आयोग / राष्ट्रीय जनजाती आयोग व इतर समित्यांचे शिफारशीवर कार्यवाहीबाबत कामकाज पाहणे.
- अनुसूचित जाती / जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा 1989 व त्याअनुषंगाने येणाऱ्या तक्रारी व त्यांचे निराकरण करणे.
- आदिवासी युवकांसाठी सेवायोजन विषयक कामकाज पाहणे.
- पोलीस/सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्रासंबंधीचे कामकाज हाताळणे.
- शबरी घरकुल योजना/पारधी विकास आराखडा/गृहनिर्माण संस्था, महिला स्वयंसहाय्यता बचत गट/ जमीनविषयक तक्रारी/ भुमीहीन स्वाभिमान व सबळीकरण योजना/ कन्यादान योजना/ ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा कार्यक्रम/ कौशल्य विकास कार्यक्रम / विजपंप / तेलपंप / पीव्हीसी पाईप / एच.डी.पी.ई. पाईप इत्यादीविषयक कामकाज हाताळणे.
- अनुसूचित जमाती कल्याण समिती / जनजाती सल्लागार परिषद / अनुसूचित जाती जमाती आयोग / राष्ट्रीय जनजाती आयोग व इतर समित्यांचे शीफारशींवर कार्यवाही करणे.
- अनुसूचित जाती/जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा 1989 व त्याअनुषंगाने सादर करावयाचे अहवाल.
- महाराष्ट्र अनुसूचित जमाती आर्थिक सुधारणा कायदा व त्याअनुषंगाने येणाऱ्या तक्रारी व त्यांचे निराकरण करणे.
- पंचायत राज/ पेसा कायदा/ वनजमीन अतिक्रमण / खावटी कर्ज / ग्रेड 3 व 4 च्या बालकांच्या पालकांना बुडीत मजुरी देणे, राजमाता जिजाऊ बालपोषण मिशन बाबत कामकाज, राज्य ग्रामीण सोसायटी.
- शासकीय आश्रमशाळा / वसतिगृहांसाठी भारतीय संविधानाच्या 275 (1) अंतर्गत ठेव अंशदानामधुन दुरुस्ती, संरक्षण भींत, रस्त्यांची कामे करणे.
- शासकीय आश्रमशाळा / वसतिगृह साठी भारतीय संविधानाच्या 275 (1) अंतर्गत सोलार वॉटर हिटर व रेनवॉटर हार्व्हेस्टींग करणे.

**सहाय्यक प्रकल्प अधिकारी (शिक्षण) (मुख्यालय)**
**(वेतन स्तर :- एस-15: 41800-132300)**

- शैक्षणिक संस्थातील शैक्षणिक कार्यावर देखरेख ठेवणे.

- शैक्षणिक संस्थातील शैक्षणिक स्तर उंचावण्याच्या दृष्टीने धोरण व कार्यपध्दती निश्चित करण्याकरिता अपर आयुक्तांना सहाय्य करणे व त्यांची अंमलबजावणी करणे.
- शिक्षकांचे प्रशिक्षणाबाबत धोरण ठरविणे.
- क्रीडा व कला गुण विकसित करण्यासाठी स्पर्धा इत्यादीचे आयोजन करणे आणि स्पर्धात्मक स्तर उंचावण्याच्या दृष्टीने धोरण ठरविणे.
- शासकीय/अनुदानित/शासकीय वसतिगृहाच्या शैक्षणिक कामकाजाची तपासणी करणे व त्यावर देखरेख ठेवणे.
- अंतर्गत परिक्षणाबाबत धोरण ठरविणे व त्याप्रमाणे व्यवस्था करुन घेणे.
- शैक्षणिक स्तर उंचावण्याकरिता इतर विभागाशी संपर्क व समन्वय साधणे, तसेच गुणवत्ता विकासाचे विविध उपक्रम, प्रशिक्षण, ज्यादा वर्ग, विशेष शिकवणी वर्ग इत्यादी कार्यक्रम राबविणे.
- शिष्यवृत्ती योजनांचे कामकाज पाहणे.
- नवीन आश्रमशाळा प्रस्ताव प्राप्त करणे, प्रस्तावाची छाननी करणे, शिफारस करणे.
- कार्यरत आश्रमशाळांमध्ये वर्गवाढ, श्रेणीवाढ इत्यादी संबंधी नवीन बाब प्रस्ताव, पुरवणी मागणी इत्यादी तयार करुन शासनास सादर करणे.
- शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा, शासकीय वसतिगृह योजनेसंबंधि विधानसभा / विधानपरिषद तारांकित/ अतारांकित प्रश्न, लक्षवेधी सूचना, कपात सूचना इत्यादी विषयक कामकाज करणे.
- आश्रमशाळा संबंधी लोकआयुक्त, न्यायालयीन प्रकरणे, न्यायाधिकरण प्रकरणे इत्यादी कामकाज पाहणे.
- विद्यार्थी मृत्यु प्रकरण, आश्रमशाळा संहिता, समिती, लेखा आक्षेप, अनुदानित आश्रमशाळा व्यवस्थापन, तक्रारी, अनुदानित आश्रमशाळा अनुदान निर्धारण, नियोजन आराखडा, इमारत बांधकाम, भाडे, आदर्श आश्रमशाळा, केंद्रीय आश्रमशाहा इत्यादी कामकाज पाहणे.
- एकलव्य पब्लीक स्कुल व इंग्रजी माध्यमाच्या शाळा प्रवेश प्रक्रियाबाबतचे कामकाज.
- एकलव्य रेसिडेंशिअल स्कुल/ इंग्रजी माध्यमाच्या शाळांकरीता भूसंपादन, बांधकाम, इमारत दुरुस्ती आराखडा तयार करणे. बांधकामासाठी व इतर कामांसाठी आवश्यक निधीची मागणी नोंदविणे, कार्यक्रम अंदाजपत्रकाचे धर्तीवर अंदाजपत्रक तयार करणे.
- एकलव्य पब्लीक स्कुल योजनाविषयक कामकाजासंबंधी तक्रारी, मागण्या व संकीर्ण पत्रव्यवहार.

**सहाय्यक प्रकल्प अधिकारी (शिक्षण) (शासकीय आश्रमशाळा)**
**(वेतन स्तर :- एस-15: 41800-132300)**

- नवीन शासकीय प्राथमिक / माध्यमिक आश्रमशाळा प्रस्ताव प्राप्त करणे, प्रस्तावांची छाननी करणे, शिफारस करणे.
- कार्यरत शासकीय माध्यमिक आश्रमशाळा / कनिष्ठ महाविद्यालये नैसर्गिक वर्गवाढ, श्रेणीवाढ, तुकडीवाढ प्रस्ताव सादर करणे.
- बृहत आराखडयानुसार आश्रमशाळा स्थलांतर, वाढते वर्ग, बदलत्या श्रेणीनुसार आश्रमशाळा यादी अद्यावत करणे.
- फिरते वैद्यकिय पथकामार्फत आश्रमशाळेत करण्यात आलेल्या/ येत असलेल्या कार्यवाहीबाबत व वैद्यकिय उपचाराबाबत माहिती संकलित करणे.
- शासकिय आश्रमशाळा मृत्यु प्रकरणे हाताळणे.
- आश्रमशाळांना विशेष प्रोत्साहन योजनाविषय कामकाज इ. 10 वी व 12 वी गुणवत्ता विकास व निकाल उंचावणे / अपेक्षित उपयोजना करणे / गुणवंत विद्यार्थ्यांसाठी बक्षीस योजना राबविणे / केंद्रीय सहाय्य अंतर्गत इ. 9 वी ते 12 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविणे.
- आश्रमशाळा इमारत घरभाडे प्रस्ताव.
- आश्रमशाळा शैक्षणीक वार्षीक तपासणी कार्यक्रमाची अंमलबजावणी, श्रेणी निश्चित करणे, भेटी व तपासणीचे मासिक / त्रैमासिक अहवाल सादर करणे व तपासणी अहवालात निदर्शनास आलेल्या त्रृटींची पूर्तता करणे.
- क्षेत्रीय कार्यालयातील शैक्षणिक कामकाजाबाबत सनियंत्रण व समन्वय साधणे.
- आश्रमशाळा/सहशोलय नियोजन, सुट्यांचे व परीक्षांचे वार्षिक नियोजन करणे.

- शासकिय आश्रमशाळेतील शिक्षकांसाठी सेवांतर्गत प्रशिक्षण/ शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी संगणक प्रशिक्षण आयोजित करणे, गट संमेलन आयोजन, शासकीय आश्रमशाळा, क्रीडा विषयक सर्व बाबी पाहणे, आश्रमशाळा संहिता तयार करणे, लेखा आक्षेपांची पूर्तता करणे.
- आश्रमशाळेत अध्ययन व अध्यापन सुरळीत सुरु राहण्यास येणारे अडथळे, उणीवा व तत्सम घटकांचा आढावा घेणे.
- आश्रमशाळेतील प्रवेशार्थी विद्यार्थी माहिती संकलन करणे / शालेय शैक्षणीक गळती आढावा व उपाययोजना करणे.
- शासकीय आश्रमशाळेतील इ. 10 वी व 12 वी परीक्षेचा निकाल संकलन व वरिष्ठ कार्यालयास अहवाल सादर करणे.
- नवीन इंग्रजी माध्यमिक / एकलव्य रेसिडेंशियल पब्लीक स्कुल / नामांकित / सैनिकी शाळाविषयक कामकाज.
- शासकीय आश्रमशाळा योजनाविषयक विधानसभा / विधानपरिषद तारांकित/ अतारांकित प्रश्न, लक्षवेधी सूचना, कपात सूचना इत्यादी विषयक कामकाज करणे. आश्रमशाळा संबंधी लोकआयुक्त, न्यायालयीन प्रकरणे, न्यायाधिकरण प्रकरणे इत्यादी कामकाज पाहणे.
- आश्रमशाळेत स्काऊट गाईड, कब बुलबुल अभ्यासक्रम राबविणे.
- राष्ट्रीय शिक्षक दिन, आदर्श शिक्षक पुरस्कार, आदर्श आश्रमशाळा कामकाज पाहणे.

**सहाय्यक प्रकल्प अधिकारी (शिक्षण) (शिष्यवृत्ती)**
**(वेतन स्तर :- एस-15: 41800-132300)**

- अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार पोस्ट मॅट्रीकेत्तर शिष्यवृत्ती लाभ प्रदान करणे.
- अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण फी, परीक्षा फी प्रदान करणे.
- अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमास फी प्रतिपूर्ती व निर्वाहभत्ता मंजूर करणे.
- अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देणे.
- अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना सुवर्ण महोत्सवी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती (इयत्ता 1 ली ते 10 वी)
- अपंग आदिवासी विद्यार्थ्यांना वाहनभत्ता व शिष्यवृत्ती योजना.
- शिष्यवृत्ती व इतर शैक्षणीक योजनाविषयक विधानसभा, विधानपरिषद तारांकित/अतारांकित प्रश्नविषयी कामकाज हाताळणे.
- सर्व प्रकारच्या शिष्यवृत्ती व इतर शैक्षणिक योजना संदर्भात न्यायालयीन प्रकरणे, लोकआयुक्त प्रकरणे, मानवी हक्क आयोग, माहिती अधिकार प्रकरणे इत्यादी.

**सहाय्यक प्रकल्प अधिकारी (शिक्षण) (अनुदानित आश्रमशाळा)**
**(वेतन स्तर :- एस-15: 41800-132300)**

- प्रकल्प कार्यालयांतर्गत सुरु करावयाच्या अनुदानित आश्रमशाळाबाबत माहिती संकलित करुन वरिष्ठ कार्यालयाशी पत्रव्यवहार करणे.
- नवीन प्राथमिक / माध्यमिक अनुदानित आश्रमशाळा प्रस्ताव, माध्यमिक आश्रमशाळा व कनिष्ठ महाविद्यालयांचे वर्गवाढ, श्रेणीवाढ प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास सादर करणे व मंजूरी प्राप्त झाल्यानंतर त्याबाबतची नोंदवही अद्यावत ठेवणेची कार्यवाही करणे.
- नवीन प्राथमिक / माध्यमिक अनुदानित आश्रमशाळा व कनिष्ठ माहाविद्यालयाचे वर्गवाढ, श्रेणीवाढ, तुकडीवाढ प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास सादर करणे.
- अनुदानित आश्रमशाळा शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या, मान्यता इ. बाबत पत्रव्यवहार करणे.
- अनुदानित आश्रमशाळा शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी शाळानिहाय मान्यता इ. बाबत पत्रव्यवहार करणे.
- अनुदानित आश्रमशाळा कर्मचारी भविष्य निर्वाह निधी विषयक बाबी हाताळणे व त्यांच्या हिशोब चिठ्ठया बाबतची माहिती नमुन्यात कर्मचारीनिहाय/शाळानिहाय माहिती संकलित करणे.
- अनुदानित आश्रमशाळा कर्मचाऱ्याची सेवानिवृत्तीविषयक प्राप्त होणाऱ्या तक्रारी, मागण्या व संकीर्ण पत्रव्यवहार हाताळणे.
- अनुदानित आश्रमशाळा शालेय इमारत, मुलां मुलींचे वसतिगृह इमारत, शाळा कार्यालय इ. इमारती, त्यामधील वर्गखोल्या, ग्रंथालय, प्रयोगशाळा, स्वच्छतागृह, स्नानगृह, पाणी पुरवठा, विद्युत व्यवस्था, बहुउद्देशीय हॉल इत्यादी सुविधांची माहिती

संकलित करणे, शाळा आवाराभोवती संरक्षक भिंत बांधणे, वृक्षारोपण, बगीचा, क्रीडांगण इ. माहितीचे संकलन करणे, सदर माहिती शाळानिहाय तयार करणे.

- अनुदानित आश्रमशाळांच्या जमिनी प्राप्त/ अप्राप्त बाबतची माहिती तयार करणे, प्राप्त जमिनीवर इमारत बांधकामासाठी करण्यात आलेली/ सुरु असलेल्या कार्यवाहीबाबत माहिती संकलन करणे, जमिन अप्राप्त आश्रमशाळांना जमिन प्राप्त करण्यासाठी करीत असलेल्या कार्यवाहीची माहिती संकलित करणे.
- प्रतिवर्षी वरिष्ठ कार्यालयामार्फत प्राप्त होणाऱ्या सूचनाप्रमाणे अनुदानित आश्रमशाळांची गोपनीयरित्या तपासणी करुन तपासणी अहवालाप्रमाणे आश्रमशाळांची श्रेणी निश्चित करुन वरिष्ठ कार्यालयास अहवाल सादर करणे.
- विषयाशी संबंधीत बाबीच्या सांख्यीकी व इतर स्वरुपाच्या माहितीचे संगणकावर संकलन करणे.
- अनुदानित आश्रमशाळांची पटपडताळणी करुन विद्यार्थी संख्या कमी असल्यास तसा अहवाल वरिष्ठ कार्यालयास सादर करणे.
- कामकाजासंबधीच्या तसेच शाळा व्यवस्थापनाबाबत विविध तक्रारी, मागण्या व संकीर्ण पत्रव्यवहार हाताळणे.
- अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थी संख्येची इयत्तानिहाय, शाळानिहाय, प्रकल्पनिहाय त्रैमासिक माहिती संकलित करणे.
- अनुदानित आश्रमशाळांत बायोमेट्रीक प्रणालीप्रमाणे विद्यार्थी उपस्थितीची माहिती संकलित करणे, सदर प्रणाली सर्वत्र कार्यान्वीत करणेबाबतचे निर्देश देणे व त्यानुषंगिक पत्रव्यवहार करणे.
- अनुदानित आश्रमशाळांतील सोयी सुविधांच्या माहितीचे संकलन करुन माहिती अद्ययावत ठेवणे.
- अनुदानित आश्रमशाळांचे इ. 10 वी व 12 वी निकालांचे शाळानिहाय संकलन करणे, कमी निकाल लागलेल्या शाळा व्यवस्थापन, संबंधीत विषय शिक्षक यांचेविरुध्द कार्यवाही करणेबाबत वरिष्ठ कार्यालयास प्रस्ताव सादर करणे.
- अनुदानित आश्रमशाळा कर्मचारी/संस्थाचालक संघटना निवेदने व अनुषंगाने पत्रव्यवहार, बैठकांचे आयोजन, इतिवृत्त लेखन व तदनुषंगिक अनुपालन इत्यादीबाबत पत्रव्यवहार व माहिती संकलन.
- अनुदानित आश्रमशाळेतील कर्मचाऱ्याच्या प्राप्त वैद्यकिय प्रतिपूर्ती देयकांना वित्तीय अधिकाराच्या मर्यादेत राहुन मंजूरी प्रदान करण्यास्तव वरिष्ठ कार्यालयास प्रस्तावित करणे.
- अनुदानित आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीबाबतचा मासिक व त्रैमासिक अहवाल मागविणे, पृथ:करण करणे व तद्नुषंगिक पत्रव्यवहार.
- अनुदानित आश्रमशाळा प्रशासक, नियुक्ती व तद्नुषंगिक कार्यवाही करणेसाठी वरिष्ठ कार्यालयास प्रस्तावित करणे.
- लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणांवरील कार्यवाही व नियतकालिके.
- कार्यासनाकडून प्राप्त होणारे टपाल स्वीकारणे त्यांचे वाटप व कार्य लिपीकाकडील प्रलंबित संदर्भ, प्रकरणे इत्यादीची माहिती संकलित करुन गोषवारा र.व.का. शाखेस सादर करणे.
- अनुदानित आश्रमशाळांशी संबंधीत मा. लोकआयुक्त, न्यायालयीन प्रकरणे, न्यायाधिकरण प्रकरणे, मानवी हक्क आयोग यांचेशी संबंधीत प्रकरणांवरील कार्यवाही करणे.
- अनुदानित आश्रमशाळांच्या मान्यता रद्द, गैरव्यवहार, गैरव्यवस्थापन इत्यादी संदर्भात उद्भवणारी न्यायालयीन प्रकरणे, त्या संदर्भातील सुचना, याचिका, सुनावण्या इत्यादी बाबत पत्रव्यवहार व प्रकरणे हाताळणे.
- अनुदानित आश्रमशाळासंबधात प्राप्त याचिकांचे परिच्छेदनिहाय अभीप्राय सादर करण्यास्तव क्षेत्रीय कार्यालयाकडून उपस्थित मुद्यांवर वरिष्ठांच्या सल्ल्यानुसार कार्यवाही करणे.
- अनुदानित आश्रमशाळेच्या सुनावणीबाबतचे मा. न्यायालयाचे अंतरिम व अंतिम निकालानुसार कार्यवाही करणे व केलेल्या कार्यवाहीची संक्षीप्त तपशील नोंदवहीत नोंदविणे.
- कार्यासनातील अनुदानित आश्रमशाळा विषय हाताळणाऱ्या कार्यलिपीकास न्यायालयीन प्रकरणाबाबत व्यक्तीश: मार्गदर्शन करणे व न्यायालयीन कामांचे संनियंत्रण करणे.
- कार्यासनाचा केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम अनुषंगाने मासिक / त्रैमासिक व सहामाही व वार्षीक अहवाल तयार करणे व रचना व कार्यपध्दती शाखेकडे संकलनासाठी उपलब्ध करुन देणे.
- आश्रमशाळा शालांत, उच्च माध्यमिक परिक्षेचा निकाल प्राप्त करणे व संकलन करणे, आश्रमशाळा विद्यार्थी संख्या इ. बाबत अद्यावत माहिती तयार ठेवणे.
- आश्रमशाळा व्यवस्थापनासंबंधीच्या / कर्मचारी यांच्याबाबतच्या तक्रारी व चौकशीसंबंधी कामकाज करणे.

- विद्यार्थी मृत्यु प्रकरणे, पुढील शैक्षणिक वर्षाचा नियोजन आराखडा, आश्रमशाळा सुधार समिती व इतर समित्यांची स्थापना, बैठक, आश्रमशाळा संहिता तयार करणे, अनुदानित आश्रमशाळा कर्मचारी मंजूरी, नेमणूका व त्यांच्या सेवाविषयक बाबी, लेखा आक्षेपांची पूर्तता करणे.
- अनुदानित आश्रमशाळा व्यवस्थापना संबंधी सर्व तक्रारी, पत्रव्यवहार व त्यांचे निराकरण, त्यांना द्यावयाचे अनुदान व त्यांचे निर्धारण करणे. इमारत बांधकाम, भाडे, केंद्रीय आश्रमशाळांचे कामकाज पाहणे.

**लेखा अधिकारी**

**(वेतन स्तर :- एस**-16: 44900-142400)

- महालेखापाल मुंबई यांच्या लेखापरिक्षण अहवालातील प्रलंबित परिच्छेदाच्या निपटाऱ्याबाबत पाठपुरावा करणे व अनुपालन तपासणी व ते सादर करण्यासंबंधीची कार्यवाही करणे.
- अंतर्गत लेखापरिक्षणातील परिच्छेदांचे अनुपालनाबाबत पाठपुरावा करणे. प्राप्त अनुपालन अहवाल तपासुन गंभीर स्वरंपाच्या आक्षेपाबाबत त्वरीत कार्यवाही प्रस्तावित करणे.
- भांडार पडताळणी पथकाने उपस्थित केलेल्या परिच्छेदांच्या निपटाऱ्याची कार्यवाही करणे.
- प्रकल्प/ वरिष्ठ कार्यालयाच्या स्तरावरील लेखा परिक्षण विषयक बैठकीसाठी अत्यावश्यक माहिती संकलित करुन सादर करणे.
- खरेदीविषयक बाबीबाबत वित्तीय सल्ला देणे.
- मा. प्रकल्प अधिकारी यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे विशेष लेखा परिक्षण / चौकशी अशी कामे पूर्ण करणे.
- प्रकल्पातील कार्यालय व संस्थावर वित्तीय दृष्टया देखरेख करणे व वेळोवेळी त्यांना मार्गदर्शन करणे.
- लेखाविषयक सर्व कामकाज पाहणे.
- आकस्मीक / सेवानिवृत्तीविषयक देयकांवर कार्यवाही करणे.
- अर्थसंकल्पीय अंदाजपत्रके तयार करणे / अर्थसंकल्पीय तरतुदीचे वाटप करणे.
- सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे उपदान, भविष्य निर्वाह निधी, तात्पुरते निवृत्ती वेतन, वैद्यकीय देयके व प्रवास देयकाबाबत कार्यवाही करणे.

**नियोजन अधिकारी**

**(वेतन स्तर :- एस**-15: 41800-132300)

- आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील नियोजनविषयक सर्व बाबी जसे वार्षिक, पंचवार्षिक योजनांची आखणी, त्यासाठी नियतव्यय निश्चित करणे, राज्य योजना, जिल्हा योजना, अनुशेषांतर्गत योजना, विशेष कृती कार्यक्रम इत्यादी कार्यक्रमाखाली क्षेत्रीय कार्यालयाकडून प्रस्ताव मागवुन ते शासनास सादर करणे.
- मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीचे शीर्षनिहाय, योजनानिहाय, जिल्हानिहाय, प्रकल्पनिहाय वाटप करणे.
- नियोजनाशी संबंधीत सर्व कामकाज पाहणे.

प्रकल्प अधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
भामरागड जि. गडचिरोली

| योजना क्र. 1 | | |
|---|---|---|
| **शासकीय आश्रमशाळा** | | |
| **अ.क्र.** | **मुद्दा** | **तपशील** |
| 1 | सेवा पुरविणारा अधिकारी/कर्मचारी | मुख्याध्यापक/प्राचार्य, शासकीय आश्रमशाळा |
| 2 | कायदे/नियम/शासन निर्णय ज्या अंतर्गत सेवा पुरविल्या जाणार आहेत. | समाजकल्याण, सांस्कृतीक, क्रिडा आणि पर्यटन विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीपी-1072/3893-जी, दिनांक 14 ऑगष्ट, 1972 |
| 3 | थोडक्यात कार्यपध्दती व अनुज्ञेय सेवा | महाराष्ट्र राज्यात डोंगराळ व दुर्गम भागात राहणाऱ्या अनुसूचित जमातीची सामाजिक व शैक्षणिक प्रगती होण्यासाठी सन 1972-73 पासून क्षेत्रविकासाचा दृष्टीकोन स्विकारुन शासकिय आश्रमशाळा सुरु करण्यात आल्या आहेत.<br>अ) इयत्ता 1 ते 12 वी चे वर्ग असलेले - 05 शाळा<br>ब) इयत्ता 1 ते 10 वी चे वर्ग असलेले - 03 शाळा<br>असे एकूण 08 शाळा कार्यान्वित आहे.<br>1. आश्रमशाळेत मोफत प्रवेश<br>2. प्रवेशीत विद्यार्थ्यांना निवास, भोजन, गणवेश, आंथरुण, पांघरुण, पुस्तके, लेखन साहित्य इ. सुविधा मोफत पुरविण्यात येते. |
| 4 | सेवा मिळण्यासाठी नागरिकांची पात्रता | 1. विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा.<br>2. प्रवेशाच्या वेळेस त्यांचे वय 5 वर्ष पुर्ण असावे. |
| 5 | अर्जाचा मान्यता प्राप्त नमुना व त्यांची उपलब्धता | अर्जाचा नमुना शासकीय आश्रमशाळा येथे उपलब्ध आहे. |
| 6 | कोणती कागदपत्रे जोडायची | 1. उपविभागीय अधिकारी/ तहसिलदार यांनी दिलेले पालकाचे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र.<br>2. प्रवेशार्थी विद्यार्थ्यांचा जन्मतारखेचा दाखला (गट विकास अधिकारी/ ग्रामसेवक/ ग्रामविकास अधिकारी इ.)<br>3. जन्माचा दाखला नसल्यास आई वडीलांचे प्रतिज्ञापत्र.<br>4. पहिली व्यतिरिक्त इतर वर्गातील प्रवेशाकरिता पूर्वीच्या शाळेचा शाळा सोडल्याचा दाखला. |
| 7 | अर्ज विक्री व स्विकृती कालावधी | 1. इ. 1 ली प्रवेशासाठी अर्ज विक्री न करता माहे 1 एप्रिल ते 30 एप्रिल अखेर आश्रमशाळा पंचक्रोशीतील गावात पट नोंदणी व इ. 2 री ते 10 वी तील रिक्त जागे बाबत पंचक्रोशीत माहिती देऊन प्रवेशासाठी आवाहन करण्यात येते.<br>2. इ. 2 री ते 10 वी तील विद्यार्थी प्रवेशासाठी<br>• दिनांक 2 मे ते 15 मे प्रवेश अर्ज वितरण<br>• दिनांक 20 मे ते 5 जुन प्रवेश अर्ज स्विकृती<br>• दिनांक 6 जुन ते 10 जुन प्राप्त प्रवेश अर्ज छाननी व प्रकल्प कार्यालय मान्यता |
| 8 | आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्या नंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल | **प्रवेश** -<br>1. दिनांक 1 जुन ते 15 जुन पर्यंत पटनोंदणीतील पात्र विद्यार्थ्यांना इ. 1 लीत प्रवेश देणे.<br>2. दिनांक 11 जुन ते 15 जुन पर्यंत 2 री ते 10 वीत प्रवेश देणे.<br>3. त्यानंतरही रिक्त जागा राहिल्यास प्रकल्प अधिकाऱ्यांच्या मान्यतेने रिक्त जागेच्या मर्यादेत अर्ज स्विकृती करुन प्रवेश देण्यात येईल.<br>**सुविधा**-<br>1. विनाशुल्क शिक्षण त्यासोबत मोफत आहार, निवास, आंथरुण, पांघरुण, ताट, वाटी व इ. शाळा सुरु दिनांकापासून<br>2. अभ्यासक्रमावर आधारित क्रमिक पुस्तके, शालेय स्टेशनरी, लेखन साहित्य व गणवेश इ. शाळा सुरु होताच तीन महिन्यात. |
| 9 | सेवाविहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करावयाचे ते कार्यालय तथा अपिलीय अधिकारी | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भामरागड दुरध्वणी क्रमांक 07134-220534 |
| 10 | अपिलीय प्राधिकारी स्तरावर प्रकरण निकाली काढण्याचा अपेक्षित कालावधी | अपिलीय प्राधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्यानंतर 45 दिवसांच्या आत. |

| योजना क्र. 2 | | |
|---|---|---|
| **स्वेच्छा संस्थांना आश्रमशाळा चालविण्यास अर्थसहाय्य** | | |
| **अ.क्र.** | **मुद्दा** | **तपशील** |
| 1 | सेवा पुरविणारा अधिकारी/कर्मचारी | मुख्याध्यापक/प्राचार्य, अनुदानित आश्रमशाळा |
| 2 | कायदे/नियम/शासन निर्णय ज्या अंतर्गत सेवा पुरविल्या जाणार आहेत. | शिक्षण विभाग, मुंबई राज्य, ठराव क्रमांक बीसीएच-1653, दिनांक 22 डिसेंबर, 1953 |
| 3 | थोडक्यात कार्यपध्दती व अनुज्ञेय सेवा | आदिवासींच्या शैक्षणिक विकासाकरीता स्वेच्छा संस्थामार्फत अनुदान तत्वावर आश्रमशाळा चालविणे. सदर आश्रमशाळा शासकिय आश्रमशाळेच्या उद्देशानेच चालविण्यात येतात. त्यासाठी सेवाभावी संस्थेस सदर आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना निवास, भोजन, गणवेश, आंथरुण, पांघरुण, पुस्तके व इतर लेखन साहित्य इ. सुविधा पुरविण्यासाठी आकस्मिक खर्च अनुदान तसेच आहारासाठी प्रति विद्यार्थी प्रति माह रु. 900/- प्रमाणे परिरक्षण अनुदान देण्यात येते. तसेच कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्याचा खर्च शासनामार्फत करण्यात येतो.<br>• पात्र विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश<br>• विनाशुल्क शिक्षण<br>• प्रवेशीत विद्यार्थ्यांना निवास, भोजन, गणवेश, आंथरुण, पांघरुण, पुस्तके व इतर लेखन साहित्य इ. सुविधा पुरविणे.<br>• याकरीता सेवाभावी संस्थेस आकस्मिक खर्च अनुदान व परिरक्षण अनुदान अदायगी.<br>• तसेच कर्मचाऱ्यांना वेतन अदायगी |
| 4 | सेवा मिळण्यासाठी नागरिकांची पात्रता | 1. विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा.<br>2. प्रवेशाच्या वेळेस त्यांचे वय 5 वर्ष पुर्ण असावे. |
| 5 | अर्जाचा मान्यता प्राप्त नमुना व त्यांची उपलब्धता | अर्जाचा नमुना शासकिय आश्रमशाळा व www.mahatribal.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. |
| 6 | कोणती कागदपत्रे जोडायची | 1. उपविभागीय अधिकारी/ तहसिलदार यांनी दिलेले पालकाचे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र.<br>2. प्रवेशार्थी विद्यार्थ्यांचा जन्मतारखेचा दाखला ( गट विकास अधिकारी/ग्रामसेवक/ ग्रामविकास अधिकारी इ.)<br>3. जन्माचा दाखला नसल्यास आई वडीलांचे प्रतिज्ञापत्र.<br>4. पहिली व्यतिरिक्त इतर वर्गातील प्रवेशाकरिता पूर्वीच्या शाळेचा शाळा सोडल्याचा दाखला. |
| 7 | अर्ज विक्री व स्विकृती कालावधी | 1. इ. 1 ली प्रवेशासाठी अर्ज विक्री न करता माहे 1 एप्रिल ते 30 एप्रिल अखेर आश्रमशाळा पंचक्रोशीतील गावात पट नोंदणी व इ. 2 री ते 10 वी तील रिक्त जागे बाबत पंचक्रोशीत माहिती देऊन प्रवेशासाठी आवाहन करण्यात येते.<br>2. इ. 2 री ते 10 वी तील विद्यार्थी प्रवेशासाठी<br>• दिनांक 2 मे ते 15 मे प्रवेश अर्ज वितरण<br>• दिनांक 20 मे ते 5 जुन प्रवेश अर्ज स्विकृती<br>• दिनांक 6 जुन ते 10 जुन प्राप्त प्रवेश अर्ज छाननी व प्रकल्प कार्यालय मान्यता |
| 8 | आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्या नंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल | 1. दि. 1 जुन ते 15 जुन पर्यंत पटनोंदणीतील पात्र विद्यार्थ्यांना इ. 1 लीत प्रवेश देणे.<br>2. दि. 11 जुन ते 15 जुन पर्यंत इ. 2 री ते 10 वीत प्रवेश देणे.<br>3. त्यानंतरही रिक्त जागा राहिल्यास प्रकल्प अधिकाऱ्यांच्या मान्यतेने रिक्त जागेच्या मर्यादेत अर्ज स्विकृती करुन प्रवेश देण्यात येईल. |
| 9 | सेवाविहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करावयाचे ते कार्यालय तथा अपिलीय अधिकारी | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भामरागड दुरध्वणी क्रमांक 07134-220534 |
| 10 | अपिलीय प्राधिकारी स्तरावर प्रकरण निकाली काढण्याचा अपेक्षित कालावधी | अपिलीय प्राधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्यानंतर 45 दिवसांच्या आत. |

| योजना क्र. 3 | | |
|---|---|---|
| **शासकीय माध्यमिक आश्रमशाळा संलग्न कनिष्ठ महाविद्यालय सुरु करणे** | | |
| **अ.क्र.** | **मुद्दा** | **तपशील** |
| 1 | सेवा पुरविणारा अधिकारी/कर्मचारी | प्राचार्य, शासकिय माध्यमिक आश्रमशाळा |
| 2 | कायदे/नियम/शासन निर्णय ज्या अंतर्गत सेवा पुरविल्या जाणार आहेत. | आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक शाआशा-1096/प्रक्र 156/का-13, दिनांक 9 जुलै, 1999 |
| 3 | थोडक्यात कार्यपध्दती व अनुज्ञेय सेवा | शासकिय आश्रमशाळांमध्ये इ. 10 वी पर्यंत शिक्षण घेऊन पास झालेले अनुसूचित जमातीचे विद्यार्थी आर्थिक अडचणींमुळे तालुक्याच्या अगर जिल्हयाच्या ठिकाणी उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेउ शकत नाही. शासकिय आरमशाळांमध्येच त्यांना उच्च माध्यमिक शिक्षण घेता यावे म्हणून शासकिय माध्यमिक आश्रमशाळेत कला व विज्ञान शाखेचे कनिष्ठ महाविद्यालये जुलै 1999 पासुन सुरु करण्यात आलेली आहेत.<br>• विनाशुल्क शिक्षण |
| 4 | सेवा मिळण्यासाठी नागरिकांची पात्रता | 1. विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा.<br>2. उमेदवार इयत्ता 10 वी उत्तीर्ण असावा. |
| 5 | अर्जाचा मान्यता प्राप्त नमुना व त्यांची उपलब्धता | अर्जाचा नमुना शासकिय आश्रमशाळा/कनिष्ठ महाविद्यालय येथे उपलब्ध आहे. तसेच सदर अर्ज नमुना www.mahatribal.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. |
| 6 | कोणती कागदपत्रे जोडायची | 1. प्रत्यक्ष प्रवेश देतेवेळी पालकाचा/विद्यार्थ्यांचा जमातीचा दाखला, जन्मतारखेचा दाखला, जन्माचा दाखला नसल्यास आई वडीलांचे प्रमाणपत्र<br>2. पूर्वीच्या शाळेचा शाळा सोडल्याचा दाखला |
| 7 | आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्या नंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल | जागेच्या उपलब्धतेनुसार शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यानंतर 10 दिवसांच्या आत प्रवेश दिल्या जाईल. तद्नंतरही रिक्त जागा राहिल्यास प्रकल्प अधिकारी यांचे मान्यतेने प्रवेश दिल्या जाईल. |
| 8 | सेवाविहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करावयाचे ते कार्यालय तथा अपिलीय अधिकारी | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भामरागड दुरध्वणी क्रमांक 07134-220534 |
| 9 | अपिलीय प्राधिकारी स्तरावर प्रकरण निकाली काढण्याचा अपेक्षित कालावधी | अपिलीय प्राधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्यानंतर 45 दिवसांच्या आत. |

| योजना क्र. 4 | | |
|---|---|---|
| **अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये शिक्षण देणे** | | |
| **अ.क्र.** | **मुद्दा** | **तपशील** |
| 1 | सेवा पुरविणारा अधिकारी/कर्मचारी | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भामरागड |
| 2 | कायदे/नियम/शासन निर्णय ज्या अंतर्गत सेवा पुरविल्या जाणार आहेत. | आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक शाआशा-2008/प्रक्र 81/का-13, दिनांक 28 ऑगष्ट, 2009 |
| 3 | थोडक्यात कार्यपध्दती व अनुज्ञेय सेवा | अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी याकरीता सन 2009-10 या शैक्षणिक वर्षापासून शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये इ. 1 ली ते 12 वी पर्यंत शिक्षण देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. प्रतिवर्ष प्रति प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प 100 विद्यार्थ्यांना नामांकित शाळेत शिक्षणासाठी पाठविण्यात येते, व वेळोवेळी आवश्यकतेनुसार लक्षांकात वाढ/घट करण्यात येते.<br>• नामांकित शाळेतील विद्यार्थ्यांना संबंधित नामांकित शाळेमार्फत शालेय गणवेश, वहया, पुस्तके, बुटमोजे, रेनकोट, अंडर गारमेन्टस, भोजन, निवास खर्च, टयुशन फी, प्रवेश फी, सुरक्षा अनामत, शिक्षण शुल्क इ. सुविधा पुरविण्यात येतात. सदर अनुज्ञेय रक्कम आदिवासी विकास विभागामार्फत नामांकित शाळेस अदा करण्यात येते.<br>• तसेच निवासी शाळेत राहणाऱ्या विद्यार्थ्यांना वर्षातुन दोनदा पालकांना भेटण्यासाठी स्वग्राम जाण्याकरीता प्रवास खर्च व पालकांना आपल्या पाल्यांना शाळेत येऊन भेटण्याकरीता दोनदा प्रवास खर्च देण्यात येतो. |
| 4 | सेवा मिळण्यासाठी नागरिकांची पात्रता | 1. विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा. |

| | | |
|---|---|---|
| | | 2. या योजनेचा लाभ घेऊ इच्छिनाऱ्या मुलांच्या पालकाचे उत्पन्नाची कमाल मर्यादा रु. 1.00 लाख इतकी असावी.<br>3. विद्यार्थी दारिद्र्य रेषेखालील असेल तर त्यासंबंधीचा यादीतील अनुक्रमांक नमुद करण्यात यावा. |
| 5 | अर्जाचा मान्यता प्राप्त नमुना व त्यांची उपलब्धता | अर्जाचा नमुना सबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भामरागड येथे तसेच सदर अर्ज नमुना www.mahatribal.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. |
| 6 | कोणती कागदपत्रे जोडायची | प्रत्यक्ष प्रवेश देतेवेळी पालकाचा अनुसूचित जमातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, जन्मतारखेचा दाखला, जन्माचा दाखला नसल्यास आई वडीलांचे संमतीपत्र. |
| 7 | आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्या नंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल | जागेच्या उपलब्धतेनुसार शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यानंतर 10 दिवसांच्या आंत प्रवेश देतील. |
| 8 | सेवाविहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करावयाचे ते कार्यालय तथा अपिलीय अधिकारी | अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर<br>दुरध्वणी क्रमांक 0712-2560127, 2560314 |
| 9 | अपिलीय प्राधिकारी स्तरावर प्रकरण निकाली काढण्याचा अपेक्षित कालावधी | अपिलीय प्राधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्यानंतर 45 दिवसांच्या आत. |

| योजना क्र. 5 | | |
|---|---|---|
| **आदर्श आश्रमशाळा** | | |
| **अ.क्र.** | **मुद्दा** | **तपशील** |
| 1 | सेवा पुरविणारा अधिकारी/कर्मचारी | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भामरागड |
| 2 | कायदे/नियम/शासन निर्णय ज्या अंतर्गत सेवा पुरविल्या जाणार आहेत. | - |
| 3 | थोडक्यात कार्यपध्दती व अनुज्ञेय सेवा | शासकिय/ अनुदानित आश्रमशाळांत इयत्ता 4 थीत शिक्षण घेणाऱ्या हुशार/ बुध्दीवान/प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना विद्यानिकेतनच्या धर्तीवर विशेष स्वरुपाची निवासी आश्रम शाळा सन 1990-91 मध्ये देवमोगरा, ता. अक्कलकुवा जि. नंदुरबार व भंडारदरा ता. अकोले जि. अहमदनगर या दोन ठिकाणी सुरु करण्यात आल्या आहेत.<br>• विनामुल्य शिक्षण<br>• सदर आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना निवास, भोजन, गणवेश, आंथरुण, पांघरुण, पुस्तके व इतर लेखन साहित्य इ. मोफत सुविधा |
| 4 | सेवा मिळण्यासाठी नागरिकांची पात्रता | 1. विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा.<br>2. 31 जुलै ला 9 वर्ष वय पूर्ण असावे.<br>3. पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. 1,00,000/- असावे. |
| 5 | अर्जाचा मान्यता प्राप्त नमुना व त्यांची उपलब्धता | अर्जाचा नमुना शासकिय/अनुदानित आश्रमशाळा/प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भामरागड येथे तसेच सदर अर्ज नमुना www.mahatribal.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. |
| 6 | कोणती कागदपत्रे जोडायची | 1. प्रत्यक्ष प्रवेश देतेवेळी पालकाचा अनुसूचित जमातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, जन्मतारखेचा दाखला, जन्माचा दाखला नसल्यास आई वडीलांचे प्रतिज्ञापत्र.<br>2. इयत्ता 4 थीत प्रवेश घेत असलेल्या पूर्वीच्या शाळेचा शाळा सोडल्याचा दाखला |
| 7 | आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्या नंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल | जागेच्या उपलब्धतेनुसार शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यानंतर 10 दिवसांच्या आंत प्रवेश देतील. |
| 8 | सेवाविहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करावयाचे ते कार्यालय तथा अपिलीय अधिकारी | अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर<br>दुरध्वणी क्रमांक 0712-2560127, 2560314 |
| 9 | अपिलीय प्राधिकारी स्तरावर प्रकरण निकाली काढण्याचा अपेक्षित कालावधी | अपिलीय प्राधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्यानंतर 45 दिवसांच्या आत. |

| योजना क्र. 6 | | |
|---|---|---|
| **आदिवासी मुलां / मुलींकरिता शासकीय वसतीगृहे** | | |
| **अ.क्र.** | **मुद्दा** | **तपशील** |
| 1 | सेवा पुरविणारा अधिकारी/कर्मचारी | संबंधित गृहपाल, शासकीय वसतीगृह |
| 2 | कायदे/नियम/शासन निर्णय ज्या अंतर्गत सेवा पुरविल्या जाणार आहेत. | आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीएच-1384/36327/का-12, दिनांक 11 जुलै, 1985 |
| 3 | थोडक्यात कार्यपध्दती व अनुज्ञेय सेवा | अनुसूचित जमातीच्या मुलां/मुलींना उच्च शिक्षणाची सोय व्हावी व त्यांची शैक्षणिक उन्नती व्हावी या उद्देशाने सदर योजना सुरु करण्यात आलेली आहे.<br>• शासकिय वसतीगृहात रिक्त जागांच्या प्रमाणांत गुणवत्तेनुसार मोफत प्रवेश देणे.<br>• शासकिय वसतीगृहात गुणवत्तेनुसार प्रवेश देऊन त्यांना निवास, भोजन, गणवेश, आंथरुण, पांघरुण, पुस्तके शैक्षणिक व इतर आवश्यक साहित्य मोफत पुरविणे. |
| 4 | सेवा मिळण्यासाठी नागरिकांची पात्रता | 1. विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा.<br>2. विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. 1.08 लक्ष च्या आत असणे आवश्यक आहे.<br>3. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकडून विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करुन त्यांची छानणी प्रकल्प कार्यालयामार्फत होवून पात्र विद्यार्थ्यांना वसतीगृहात प्रवेश देण्यात येतो.<br>4. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी 65 टक्के, कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी 25 टक्के, विद्यालयीन विभागासाठी 10 टक्के जागा राखीव. |
| 5 | अर्जाचा मान्यता प्राप्त नमुना व त्यांची उपलब्धता | अर्जाचा नमुना संबंधित वसतीगृह तसेच सदर अर्ज नमुना www.mahatribal.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. |
| 6 | कोणती कागदपत्रे जोडायची | 1. शाळा सोडल्याचा दाखला<br>2. ज्या इयत्तेचा उत्तीर्ण झाले गुणपत्रिकेची प्रत.<br>3. दारिद्र्य रेषेखालील असल्यास प्रमाणपत्र्.<br>4. उपविभागीय अधिकारी/तहसिलदार यांनी दिलेले पालकाचे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र.<br>5. पालकांचा सक्षम अधिकाऱ्यांचा उत्पन्नाचा दाखला.<br>6. कुटूंबाचे हमीपत्र. |
| 7 | अर्ज विक्री व स्विकृती कालावधी | 1. इ. 1 ली प्रवेशासाठी अर्ज विक्री न करता माहे 1 एप्रिल ते 30 एप्रिल अखेर आश्रमशाळा पंचक्रोशीतील गावात पट नोंदणी व इ. 2 री ते 10 वी तील रिक्त जागे बाबत पंचक्रोशीत वृत्तपत्रात जाहिरातीद्वारे माहिती देऊन प्रवेशासाठी आवाहन करण्यात येते.<br>2. इ. 8 वी ते 10 वी तील विद्यार्थी प्रवेशासाठी<br>• दिनांक 2 मे ते 15 मे प्रवेश अर्ज वितरण<br>• दिनांक 20 मे ते 5 जुन प्रवेश अर्ज स्विकृती<br>• दिनांक 6 जुन ते 10 जुन प्राप्त प्रवेश अर्ज छाननी व प्रकल्प कार्यालय मान्यता व कनिष्ठ महाविद्यालय ते वरिष्ठ महाविद्यालयाचे प्रवेश अर्ज निकालाचे दिनांकापासून 15 दिवस |
| 8 | आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्या नंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल | **प्रवेश** -<br>• विद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी दि.26 मे ते 31 मे अखेरपर्यंत अर्ज छाननी व 1 जुन ते 10 जुन पर्यंत प्रत्यक्षात प्रवेश.<br>• कनिष्ठ महाविद्यालयीन (इ. 11 वी) विद्यार्थ्यांसाठी दि. 26 जुन ते 30 जुन अर्ज छाननी व 1 ते 10 जुलै पर्यंत प्रत्यक्षात प्रवेश.<br>• महाविद्यालयीन (प्रथम वर्ष) विद्यार्थ्यांसाठी 21 जुन ते 25 जुन पर्यंत अर्ज छाननी व 26 जुन ते 30 जुन पर्यंत प्रत्यक्षात प्रवेश.<br>• व्यावसायीक अभ्यासक्रमासाठी सदर मुदत प्राप्त अभ्यासक्रमाचे निकालावर अवलंबुन राहील.<br>**सुविधा-**<br>1. मोफत आहार, निवास, आंथरुण, पांघरुण, ताट, वाटी व इ. वसतीगृह सुरु |

| | | |
|---|---|---|
| | | दिनांकापासून<br>2. अभ्यासक्रमावर आधारित क्रमिक पुस्तके, शालेय स्टेशनरी, लेखन साहित्य इ. वसतीगृह सुरु होताच तीन महिन्यात. |
| 9 | सेवाविहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करावयाचे ते कार्यालय तथा अपिलीय अधिकारी | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भामरागड दुरध्वणी क्रमांक 07134-220534 |
| 10 | अपिलीय प्राधिकारी स्तरावर प्रकरण निकाली काढण्याचा अपेक्षित कालावधी | अपिलीय प्राधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्यानंतर 30 दिवसांच्या आत. |
| **योजना क्र. 7** | | |
| **अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्ती (भारत सरकार शिष्यवृत्ती) योजना** | | |
| **अ.क्र.** | **मुद्दा** | **तपशील** |
| 1 | सेवा पुरविणारा अधिकारी/कर्मचारी | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भामरागड |
| 2 | कायदे/नियम/शासन निर्णय ज्या अंतर्गत सेवा पुरविल्या जाणार आहेत. | आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांक आदिशी-1204/प्रक्र 9/का-12, दिनांक 9 ऑगष्ट, 2004 |
| 3 | थोडक्यात कार्यपध्दती व अनुज्ञेय सेवा | आदिवासी विद्यार्थ्यांना शालांत परिक्षोत्तर उच्च शिक्षणाकरीता प्रोत्साहित करण्याच्या दृष्टीने व त्यांना उच्च शिक्षणाचा खर्च भागविता यावा म्हणून भारत सरकारद्वारा हि योजना राबविली जाते.<br>1. वैद्यकिय व अभियांत्रिक अभ्यासक्रमातील निवासी विद्यार्थ्यांना रु. 1200/- व अनिवासीसाठी रु. 550/- मासिक निर्वाह भत्ता.<br>2. तांत्रिक, आयुर्वेदिक, होमिओपॅथीक इ. शास्त्र अभ्यासक्रमातील निवासी विद्यार्थ्यांसाठी रु. 820/- दरमहा व अनिवासी विद्यार्थ्यांसाठी रु. 530/- दरमहा मासिक निर्वाह भत्ता.<br>3. पदवीचे सामान्य अभ्यासक्रम, अभियांत्रिकी पदविका प्रमाणपत्र वास्तुकला इ. साठी निवासी रु. 570/- व अनिवासीसाठी रु. 300/- मासिक निर्वाह भत्ता.<br>4. इ. 11 वी व 12 वी साठी व पदवीचे पहिल्या वर्षातील निवासी विद्यार्थ्यांसाठी दरमहा रु. 380/- व अनिवासीसाठी रु. 230/- मासिक निर्वाह भत्ता देण्यात येतो.<br>5. वरील अभ्यासक्रमांचे अनुज्ञेय शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क संबंधित महाविद्यालयास अदा केले जाते. |
| 4 | सेवा मिळण्यासाठी नागरिकांची पात्रता | 1. विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा.<br>2. पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. 2.50 लाखापेक्षा जास्त नसावे.<br>3. विद्यार्थी पुर्णवेळ नोकरीत नसावा.<br>4. एकाच कुटूंबातील फक्त 2 मुलांना परंतू सर्व मुलींना लाभ देण्यात येतो. |
| 5 | अर्जाचा मान्यता प्राप्त नमुना व त्यांची उपलब्धता | अर्जाचा नमुना प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भामरागड व ऑनलाईन अर्ज नमुना ई. शिष्यवृत्ती संकेतस्थळावर उपलब्ध आहे. |
| 6 | कोणती कागदपत्रे जोडायची | प्रत्यक्ष योजनेचा लाभ देतेवेळी जातीचा दाखला, उत्पन्न दाखला, प्रवेश पावती व अनुषंगीक कागदपत्रे |
| 7 | आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्या नंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल | परिपूर्ण अर्ज प्राप्तीनंतर निधीच्या उपलब्धतेनुसार वरील अनुज्ञेय सेवा पुरविली जाते. त्याचा सर्वसाधारण कालावधी खालीलप्रमाणे असेल.<br>महाविद्यालयात अर्ज सादर करणे 15 ऑगष्ट<br>महाविद्यालयाने प्रकल्प अधिकाऱ्यांना अर्ज सादर करणे 15 सप्टेंबर<br>प्रकल्प अधिकाऱ्याकडून छाननी 15 ऑक्टोंबरपर्यंत<br>विद्यार्थ्यांच्या बँक खातेवर जमा करणे 30 नोव्हेंबरपर्यंत<br>मात्र ज्या विद्यार्थ्यांचे उशिरा निकालामुळे प्रवेश उशीरा होतील. त्यांनी वरील मुदतीमध्ये 1 महिन्याची वाढ अनुज्ञेय राहील.<br>तद्नंतर निधीच्या उपलब्धतेनुसार मासिक द्वैमासिक निर्वाह भत्ता विद्यार्थी बँक खातेवर जमा करणेत येईल. |
| 8 | सेवाविहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करावयाचे ते कार्यालय तथा अपिलीय अधिकारी | अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर<br>दुरध्वणी क्रमांक 0712-2560127, 2560314 |

| | | |
|---|---|---|
| 9 | अपिलीय प्राधिकारी स्तरावर प्रकरण निकाली काढण्याचा अपेक्षित कालावधी | अपिलीय प्राधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्यानंतर 45 दिवसांच्या आत. |

**योजना क्र. 8**

**राज्यातील शासन मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीबाबत**

| अ.क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| 1 | सेवा पुरविणारा अधिकारी/कर्मचारी | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भामरागड |
| 2 | कायदे/नियम/शासन निर्णय ज्या अंतर्गत सेवा पुरविल्या जाणार आहेत. | आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांक इबीसी-1088/10729/प्रक्र/का-12, दिनांक 9 ऑगष्ट, 1989 |
| 3 | थोडक्यात कार्यपध्दती व अनुज्ञेय सेवा | वैद्यकिय शिक्षण व संलग्न शिक्षणाकरीता खाजगी शिक्षण संस्थेमध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याची योजना या अंतर्गत शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती केली जाते.<br>अ) आरोग्य विज्ञान अभ्यासक्रम (वैद्यकीय, दंत, होमिओपॅथी, युनानी, आयुर्वेद, भौतीकोपचार, व्यवसायोपचार व नर्सिंग)<br>ब) उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत असणारे अभियांत्रिकी, औषधनिर्माण, एच.एम.सी.टी.वास्तुशास्त्र, एम.बी.ए., एम.सी.ए.<br>क) कृषी, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभागांतर्गत पदविकांतर्गत पदविका, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम.<br>ड) या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना शुल्क निर्धारण समिती व तत्सम समितीने मंडळाने ठरवून दिलेल्या दराने शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क प्रतिपूर्ती केली जाते. |
| 4 | सेवा मिळण्यासाठी नागरिकांची पात्रता | 1. विद्यार्थी आदिवासी व महाराष्ट्राचा रहिवासी असावा.<br>2. त्याने वैद्यकिय, दंत, आयुर्वेद, युनानी, होमीओपॅथी, भौतीक उपचार, परिचय इ. मान्यताप्राप्त अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेला असावा.<br>3. त्याची वर्तणुक, हजेरी व प्रगती समाधानकारक असावी. |
| 5 | अर्जाचा मान्यता प्राप्त नमुना व त्यांची उपलब्धता | अर्जाचा नमुना प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भामरागड व संकेतस्थळावर उपलब्ध आहे. |
| 6 | कोणती कागदपत्रे जोडायची | जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. |
| 7 | आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्या नंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल | परिपूर्ण अर्ज प्राप्तीनंतर 10 दिवसाच्या आंत महाविद्यालयाच्या बँक खात्यात शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क जमा करणे- 30 नोव्हेंबर. |
| 8 | सेवाविहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करावयाचे ते कार्यालय तथा अपिलीय अधिकारी | अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर<br>दुरध्वणी क्रमांक 0712-2560127, 2560314 |
| 9 | अपिलीय प्राधिकारी स्तरावर प्रकरण निकाली काढण्याचा अपेक्षित कालावधी | अपिलीय प्राधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्यानंतर 45 दिवसांच्या आत. |

**योजना क्र. 9**

**व्यावसायीक पाठयक्रमात शिकणाऱ्या अनुसुचित जमातीच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देणे**

| अ.क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| 1 | सेवा पुरविणारा अधिकारी/कर्मचारी | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भामरागड |
| 2 | कायदे/नियम/शासन निर्णय ज्या अंतर्गत सेवा पुरविल्या जाणार आहेत. | आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांक इबीसी-1088/10729/प्रक्र/का-12, दिनांक 9 ऑगष्ट, 1989 |
| 3 | थोडक्यात कार्यपध्दती व अनुज्ञेय सेवा | आर्थिक दृष्टया परवडत नसल्यामुळे इतर आर्थिक सवलतीशिवाय व्यावसायिक शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना लागणाऱ्या "जादा खर्चाची" तोंडमिळवणी करता यावी म्हणून निर्वाह भत्ता देण्याची योजना.<br>अ) 4 ते 5 वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी वसतीगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना रु. 700/- दरमहा व वसतीगृहात न राहणा-या विद्यार्थ्यांना रु. 1000/- दरमहा निर्वाह भत्ता.<br>ब) 2 व 3 वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी वसतीगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना रु. 500/- दरमहा व वसतीगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना रु. 700/- दरमहा निर्वाह भत्ता<br>क) 2 वर्ष किंवा त्यापेक्षा कमी कालावधीच्या अभ्यासक्रमासाठी वसतीगृहात राहणाऱ्या |

| | | |
|---|---|---|
| | | विद्यार्थ्यांना रु. 500/- दरमहा व वसतीगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना रु. 500/- दरमहा निर्वाह भत्ता दिला जातो. |
| 4 | सेवा मिळण्यासाठी नागरिकांची पात्रता | 1. अनुसुचित जमातीचा विद्यार्थी व्यावसायिक पाठयक्रमात प्रवेशीत असावा.<br>2. विद्यार्थी भारत सरकार शिष्यवृत्तीधारक असावा.<br>3. व्यावसायीक पाठयक्रमात शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांने प्रथम त्यांच्या महाविद्यालयाच्या वसतीगृहात प्रवेश घेणे बंधनकारक आहे.<br>4. पालकाचे उत्पन्न भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेच्या पात्रतेसाठी जे योग्य असेल तितके असावे. |
| 5 | अर्जाचा मान्यता प्राप्त नमुना व त्यांची उपलब्धता | अर्जाचा नमुना प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भामरागड व संकेतस्थळावर उपलब्ध आहे. |
| 6 | कोणती कागदपत्रे जोडायची | प्रत्यक्ष प्रवेश देतेवेळी सक्षम प्राधिकाऱ्यांचा पालकाचा/विद्यार्थ्यांचा जमातीचा दाखला, जन्मतारखेचा दाखला, पालकाचा सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला उत्पन्नाचा दाखला. |
| 7 | आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्या नंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल | • महाविद्यालयात परिपूर्ण अर्ज सादर करणे- 15 ऑगष्ट<br>• महाविद्यालयाने प्रकल्प अधिकाऱ्यांना अर्जासह प्रस्ताव- 15 सप्टेंबर सादर करणे.<br>• प्रकल्प अधिकाऱ्याकडून प्रस्तावाची छाननी- 15 ऑक्टोंबर<br>• विद्यार्थ्यांच्या बँक खातेवर जमा करणे- 30 नोव्हेंबर<br>मात्र ज्या विद्यार्थ्यांचे उशिरा निकालामुळे प्रवेश उशीरा होतील. त्यांना वरील मुदतीमध्ये 1 महिन्याची वाढ देय राहील. |
| 8 | सेवाविहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करावयाचे ते कार्यालय तथा अपिलीय अधिकारी | अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर<br>दुरध्वणी क्रमांक 0712-2560127, 2560314 |
| 9 | अपिलीय प्राधिकारी स्तरावर प्रकरण निकाली काढण्याचा अपेक्षित कालावधी | अपिलीय प्राधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्यानंतर 30 दिवसांच्या आत. |

**योजना क्र. 10**

